**L. A. BILL No. XXXVI OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA NATIONAL LAW UNIVERSITY ACT, 2014.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६.**

**महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे)**

२०१४ चा महा. ६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यास जोडलेल्या अनुसूचीमधील, नोंद २ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :— २०१४ चा महा. ६.

| | | |
|---|---|---|
| “ २. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | . . | छत्रपती संभाजीनगर.”. |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ (२०१४ चा महा. ६) याच्या कलम ३ अन्वये, औरंगाबाद येथे मुख्यालय असणाऱ्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद याची २७ जून २०१४ पासून स्थापना केली आहे.

**२.** महाराष्ट्र शासनाने, "औरंगाबाद" महसुली क्षेत्राच्या नावात फेरबदल केला आहे आणि त्याला, "छत्रपती संभाजीनगर" असे नवीन नाव दिले आहे. "औरंगाबाद" महसुली क्षेत्राच्या नावातील "छत्रपती संभाजीनगर" असा बदल विचारात घेता, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूचीमधील "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद" या नावाऐवजी, "महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर" असे नाव दाखल करणे आणि मुख्यालयाच्या "औरंगाबाद" या नावाऐवजी, "छत्रपती संभाजीनगर" असे नाव दाखल करणे इष्ट आहे असे वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक २० डिसेंबर, २०२४.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**सन २०२४ चे वि.स. विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२४.**

**(महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यातील उतारे)**

**(सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)**

१ ते ५३. ** ** **

**अनुसूची**

**[कलम ३ (१) पहा)]**

| | विद्यापीठाचे नाव (१) | विद्यापीठाचे मुख्यालय (२) |
|---|---|---|
| १ | ** | ** |
| २ | महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद | औरंगाबाद |
| ३ | ** | ** |

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६. ]**

**[ महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ अधिनियम, २०१४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[ श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री. ]

**[ विधानसभेने दिनांक २१ डिसेंबर, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर